MHKO110022412021

**नियमित दिवाणी दावा क्र. २२६ / २०२१.**
(CNR No.**MHKO110022412021**)

## निशाणी क्र. ३२ खालील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुद्ध वाटपासाठी दाखल केला असून दावा दाखल करताना, चुकीच्या टंकलिखणामुळे दाव्यात काही चुका झाल्या आहेत त्या दुरुस्त होण्यासाठी वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीच्या कथनांनुसार त्यांना त्यांच्या दाव्यात खालील प्रमाणे दुरूस्ती करण्याची आहे.

1. *दावा कलम १ मधील चतुःसीमा या चुकीच्या नमूद केल्या आहेत. त्याबाबत दुरुस्ती अशी की, आकार रु.०-६२पै. एवढे असून त्यानंतर " यापैकी दक्षिण बाजूची ५ आणे ४ पै चा हिस्सा वादी व प्रतिवादी यांचा होत असून" अशी जादाची ओळ दुरुस्ती व त्याच बरोबर चतुःसीमा " पूर्वेस - हानिफ आदम मुलाणी, दक्षिण - यशवंत तुकाराम खाबडे यांची मिळकत, पश्चिमेस – सरकारी रस्ता, उत्तरेस- सदर गट नंबर पैकी शामराव रामजी चौगुले यांना वाटून आलेली शेत मिळकत " अशी दुरुस्ती आहे.*
2. *दावा कलम १-ब मध्ये आकार रु.०-१६ पै. एवढे असून त्यानंतर " यापैकी मध्य भागाची ५ आणे ४ पै चा हिस्सा वादी व प्रतिवादी यांचा होत असून " अशी जादाची ओळ दुरुस्ती व त्याच बरोबर चतुःसीमा " पुर्वेस - सदर गट नंबर पैकी नाना रामजी चौगुले यांना वाटून आलेली मिळकत, दक्षिणेस - दादा पाटील यांची मिळकत, पश्चिमेस - सदर ग. न. पैकी शामराव रामजी चौगुले यांना वाटून आलेली जमीन मिळकत, उत्तर - पायवाट वजा ओघळ " अशी दुरुस्ती आहे.*
3. *दावा कलम १ क मध्ये आकार रु.०-२० पै. एवढे असून, त्यानंतर "यापैकी उत्तर बाजूची ५ आणे ४ पै चा हिस्सा वादी व प्रतिवादी यांचा होत असून" अशी ज्यादाची ओळ दुरुस्ती व त्याच बरोबर चतुःसीमा "पुर्वेस - तुका खबाडे यांची मिळकत, दक्षिणेस - सदर ग.न. पैकी शामराव रामजी चौगुले यांना वाटून आलेली जमीन मिळकत, पश्चिमेस – सरकारी रस्ता, उत्तरेस - तुका खाबडे यांची मिळकत" अशी दुरुस्ती आहे.*
4. *दावा कलम १ ड मध्ये आकार रु.०-३८ पै. एवढे असून तयानंतर " यापैकी उत्तर बाजूची ५ आणे ४ पै चा हिस्सा वादी व प्रतिवादी यांचा होत असून" अशी जादाची होळ दुरुस्ती व त्या बरोबर चतुःसीमा "पूर्वेस – सरकारी रसता, दक्षिणेस - सदर ग.न. पैकी शामराव रामजी चौगुले यांना वाटून आलेली जमीन मिळकत, पश्चिमेस – सरकारी रस्ता, उत्तरेस – बापू दादा पाटील वगैरे ४ यांची मिळकत" अशी दुरुस्ती आहे.*
5. *त्याच बरोबर चतुःसीमंनंतर यणाऱ्या पॅरा कलम वरील प्रमाणे १ अ ते १ क या शेत मिळकतीत या ऐवजी, १ अ ते १ क याशेत मिळकती व त्यातील*

*विहीर पड व पाट पलान यातील सर्व हक्कासह, अशी दुरुस्ती जादा ओळ सामील करण्यात यावी.*

६. *तसेच दावा कलम ४ चे शेवटी सदर दावा कलम १ अ मधील काही क्षेत्र रस्त्यासाठी अधिग्रहण झाले असून त्याबाबतच्या पैशाबाबत कोणताही वाद नाही. परंतु त्यातील वादी यांना योणारा हिस्स्याबाबत वादी हे स्वतंत्रपणे निर्णय घेणार आहेत. व अधिग्रहण झाले असलेमुळे त्यांना सदर कामी पक्षकार म्हणून सामील केले नाही. परंतु सदर अधिग्रहणात ज्यादा क्षेत्र गेले असल्यास त्याबाबत योग्य त्या न्यायालयात क्षेत्राच्या वाढीव रकमेसंदर्भात वादी वाद दाखल करण्याचा स्वतःचा कायदेशीर हक्क तसाच ठेवत आहेत.*

०३ वादींचे पुढील कथन की, वादींनी मागितलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असलेने सदरची दुरुस्ती मंजूर होणे अत्यंत निकडीचे आहे. सबब वादींनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत आर्जवर त्यांचे म्हणणे **निशाणी क्र.३४** वर सादर केले आहे. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार, वादींचा सदरचा अर्ज खोटा, चुकीचा व लाबाडीचा आहे. दावा दुरुस्तीमुळे वादी हे जाणीवपूर्वक दावा मिळकतीबाबत संदिग्धता निर्माण करत आहेत. तसेच, दावा दाखल झाल्यानंतर तीन वर्षांनंतर वादी हे दावा दुरुस्त करत आहेत. त्यामुळे ते दाव्यास जाणीवपूर्वक विलंब करत आहेत. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०५. प्रस्तुतचा अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०६. पुढील विवेचन करण्यापूर्वी या ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ६ नियम १७ मधील खाली नमूद कायदेशीर तरतूद पाहणे उचित ठरेल.

**१७. वादकथनातील सुधारणा** -

न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारांस, त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत.

परंतु न्यायचौकशी सुरू झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुन सुद्धा न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत

न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादींनी वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींच्या कथनानुसार, प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी टंकलेखनाच्या चुकीमुळे दाव्यामध्ये दावा टंकलिखित करताना चुका झाल्या आहेत व त्या किरकोळ स्वरूपाच्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये सदरचा अर्ज मंजूर करून वादींना त्यांच्या वादकथनांमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, कारण प्रतिवादीला वादीच्या वाद कथनांमध्ये झालेल्या सुधारणेनुसार जादा कैफियत व त्या अनुषंगाने त्यांचा जादा पुरावा देण्याची मुबलक संधी आहे. तसेच प्रस्तावित सुधारणा करण्यात आल्यास दाव्याचे मूळ स्वरुप याच्यामध्ये कोणताही फेरबदल होणार नाही. उलटपक्षी दाव्याचा गुणदोषांवर अंतिम न्यायनिवाडा करणेकामी प्रस्तावित सुधारणा ही क्रमप्राप्त आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार करता, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. वादींचा **निशाणी क्र.३२** वरील अर्ज, रक्कम रू.५००/- इतक्या रकमेच्या दंडावर मंजूर करण्यात येत आहे. दंडाची रक्कम वादींनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना अदा करावी.

२. दंडाची रक्कम अदा केल्यानंतर वादींनी प्रस्तुत आदेशाचे तारखेपासुन १४ दिवसांच्या आत अर्जात नमूद केल्यानुसार दावा दुरुस्ती करून दाव्याची दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. येणेप्रमाणे निशाणी क्र.३२ वरील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

**(एल. एम. पठाण)**

दिनांक. ०७/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव